लोकमत

# एनसीसी शिष्यवृत्तीत 'विवेकानंद'ची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील चार छात्रांनी कोल्हापूर एनसीसी ग्रुपमार्फत घेतल्या गेलेल्या विविध शिष्यवृत्ती परीक्षेत बाजी मारली. त्यात सिनीयर अंडर ऑफिसर रामचंद्र अशोक चव्हाण, केतकी सहस्त्रबुद्धे, गायत्री तावडे, नीकिता भोसले यांचा समावेश आहे.

दरवर्षी छात्रसेनेतर्फे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या साला उत्कृष्ट शैक्षणिक आणि एनसीसी उपक्रमामध्ये सक्रियता दर्शविणाऱ्या छात्रांना शिष्यवृत्ती दिली जाते. यंदा एनसीसी ग्रुपमध्ये येणाऱ्या एकूण सहा बटालियनमधून निवडक छात्रांना ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. त्यात महाविद्यालयातील सिनीयर अंडर ऑफिसर रामचंद्र चव्हाण, केतकी सहस्त्रबुद्धे यांना त्यांच्या दिल्ली येथील अतुलनीय कामगिरीबद्दल बेस्ट कॅडेट स्कॉलरशीप देण्यात आली, तर गायत्री तावडे व नीकिता भोसले यांना कॅडेट वेल्फेअर सोसायटी स्कॉलरशीप देण्यात आली. या छात्रांना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, एनसीसी प्रमुख लेफ्टनंट जितेंद्र भरमगौंडा, कॅप्टन सुनीता भोसले, एनसीसी ग्रुपमधील कर्नल आर. बी. हौला, कर्नल तिवारी यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत

# विविध २८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्रात घेतलेल्या बी. टेक. (क्रेडिट सेमिस्टर सात), एम. एस्सी. टेक मॅथ्स सेमिस्टर पाच, अशा विविध २८ परीक्षांचे निकाल बुधवारी जाहीर केले.

त्यात बी. एस. डब्ल्यू., बी. आय. डी., बी. ए. ड्रेस मेकिंग., बी. व्होक. (टुरिझम ॲण्ड सर्व्हिस इंडस्ट्रीज सेमिस्टर पाच)., एम. ए. संस्कृत सेमिस्टर तीन व चार., इंडस्ट्रीयल केमिस्ट्री सेमिस्टर तीन., बी. व्होक. प्रिंटींग ॲण्ड पब्लीशिंग सेमिस्टर पाच, सस्टेनेबल ॲग्रीकल्चर सेमिस्टर तीन आणि पाच, बी. टेक सेमिस्टर सात, बी. ए. मल्टीमीडिया. बी. एस्सी. एफटीएम., एम. ए. रशियन सेमिस्टर तीन आणि चार, आदी २१ अभ्यासक्रमांचा समावेश असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली. दरम्यान, बुधवारी हिवाळी सत्रातील एकूण २६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

Kolhapur Main
Page No. 2 May 06, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# एम. फिल., पीएच.डी.च्या परीक्षा ऑनलाइन होणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या एम. फिल आणि पीएच.डी अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा दि. १४ आणि १५ मे रोजी ऑनलाइन स्वरूपात होणार आहे. त्यासाठी पात्र ५५६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने या प्रवेश परीक्षेचे अंतिमपूर्व वेळापत्रक तयार केले आहे. त्यात दि. १४ मे रोजी व्यावसायिक अर्थशास्त्र, वाणिज्य, शिक्षणशास्त्र, व्यावसायिक व्यवस्थापन, वनस्पतीशास्त्र, फार्मसी, राज्यशास्त्र, आदी १५ अभ्यासक्रमांच्या, तर दि. १५ मे रोजी पर्यावरणशास्त्र आणि अभियांत्रिकी, प्राणीशास्त्र, गृहशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा १५ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा होणार आहेत. सकाळी दहा ते दुपारी बारा, दुपारी एक ते तीन आणि दुपारी चार ते सायंकाळी सहा या सत्रांमध्ये परीक्षा होतील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर या परीक्षांचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे. त्याबाबत काही आक्षेप, त्रुटी असल्यास त्याबाबतचे ई-मेल नियुक्ती विभागाकडे शुक्रवार (दि.७) पर्यंत पाठविण्यात यावेत. त्यानंतर आलेली कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही. या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक शुक्रवारी जाहीर केले जाईल, असे परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी बुधवारी सांगितले.

# कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठ स्थापणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत बुधवारी मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने, समूह विद्यापीठ निर्माण करणे शक्य व्हावे यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार समूह विद्यापीठे स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे.

३ ते ५ विद्यमान महाविद्यालयांची संसाधने एकत्रित करून, ही विद्यापीठे निर्माण करण्याकरिता तसेच विद्यापीठाचे विविध दर्जात्मक मापदंड मोठ्या प्रमाणात दर्शवून गुणवत्तेचा दर्जा राखण्यात समर्थ असलेल्या महाविद्यालयांचा समावेश करण्यात येईल. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा (स्वायत्त) हे मुख्य महाविद्यालय व धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) आणि छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा (स्वायत्त) ही दोन सहभागी महाविद्यालये या तीन अनुदानित महाविद्यालयांचा समावेश असलेले कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा हे समूह विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.